मधुउद्योग

# मधमाशीपालन व्यवसायाचा श्रीगणेशा




सचिन उगले
(मो.नं. ९८५००७३२४२)
मधमाशीपालक,
नाशिक






गेल्या अनेक वर्षांपासून मधमाशीपालन करत असताना विविध प्रकारच्या अडचणी आल्या. त्यातून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. मधमाशी पालन व्यवसायाचा प्रारंभ करताना काय काळजी घ्यावी आणि आवश्यक गोष्टींची मांडणी कशी करायची, याबाबतचे थोडक्यात विश्लेषण...

भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय शेती आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे दरमाणशी जमिनीची घट होऊन पर्यायाने शेतीची विभागणी झाली आणि अल्प व अत्यल्पभूधारकांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारीत फार मोठी वाढ होत आहे. म्हणूनच शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसाय करणे गरजेचे झाले आहे. या जोड व्यवसायातीलच मधमाशी पालन हा एक शेतीपूरक व्यवसाय आहे. कारण या व्यवसायात मधमाशीपासून मिळणाऱ्या मध, मेण, पराग, प्रोपोलिस, बी व्हेनम व रॉयल जेली या पदार्थांचे उत्पादन घेऊन आर्थिक लाभ होतोच, शिवाय परागीभवनामुळे शेतकरी आपल्या शेतमाल उत्पादनात भरघोस वाढ करू शकतो. त्यामुळे जास्तीत जास्त युवकांनी मधमाशी पालन व्यवसायाकडे वळले पाहिजे. हा व्यवसाय करत असताना आपण काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

### शास्त्रीय प्रशिक्षण महत्त्वाचे

मधमाशीपालनाला सुरुवात करत असताना सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे प्रशिक्षण. मधमाशीपालनाचे किमान पाच ते सात दिवसांचे प्रशिक्षण घेतलेच पाहिजे. मधमाशीपालनाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सुरुवातीला एकदमच मधमाश्यांच्या वसाहती जास्त घेऊ नयेत. सुरुवातीला वर्षभर कमीत कमी मधमाश्यांच्या वसाहती घेऊन त्यामध्ये अभ्यास करून नंतर वसाहती वाढवत न्याव्यात. वर्षभर अभ्यास केल्यानंतर व्यावसायिकदृष्ट्या मधमाशीपालन करण्यासाठी किमान शंभर वसाहतींचे एक युनिट स्थापन करावे.

मधमाशीपालन यशस्वी करण्यासाठी खालील त्रिसूत्री लक्षात ठेवा.

१) वसाहती ठेवण्यास योग्य जागेची निवड





२) वसाहती सशक्त राखण्याचा प्रयत्न

३) एकात्मिक नियोजन

वसाहतीसाठी (मधुबन) योग्य जागेची निवड. वसाहतींजवळ येण्या- जाण्यासाठी व्यवस्थित रस्ता असावा. मधुबन हायवे किंवा वर्दळीच्या ठिकाणी ठेवू नये. मधुबनाशेजारी शक्यतो वाहते पाणी हवे. उन्हाळ्याच्या दिवसांत शक्यतो विरळ सावलीमध्ये मधुबन असावे. मधुबनाच्या आसपास फुलोरा किती आहे, किती दिवस असणार आहे, मधमाश्यांना किती काळ खाद्य मिळू शकेल याचाही अभ्यास करावा. मधुबनाच्या जवळपास दोन ते तीन किलोमीटरवर परिपूर्ण फुलोरा असावा तसेच आसपास तीन किलोमीटरपर्यंत दुसरे मधुबन नसावे.

साधारणपणे भारतात दोन प्रकारच्या मधमाशा पाळल्या जातात. एपिस सेरेना इंडिका व एपिस मेलिफेरा या दोन्ही मधमाश्यांच्या सभोवताली असणाऱ्या नैसर्गिक, भौगोलिक परिस्थितीचा तसेच आपण करू शकत असलेल्या आर्थिक गुंतवणुकीचा योग्य मेळ घालून मधमाशीपालन करण्यासाठी यापैकी मधमाशीच्या एका जातीची निवड करावी.

### सुयोग्य व्यवस्थापन

मधमाशीपालनातील यश हे योग्य व्यवस्थापन, मधमाश्यांची स्वभाव वैशिष्ट्ये जाणून वसाहतींचे निरीक्षण, निरीक्षणाअंती केलेल्या उपाय योजना तसेच कार्यतत्परतेने वेळच्या वेळी केलेली कामे यावर अवलंबून असते. मधमाशीपालनाचे व्यवस्थापन खालील चार मूलभूत तत्त्वांवर अवलंबून आहे.

१) वसाहतींना योग्य फुलोरा उपलब्ध असणे.

२) वसाहतीत कीड-रोग व उपद्रवी घटक यांचे व्यवस्थापन.

३) वसाहत तपासणी व इतर गरजेच्या उपाययोजना. योग्य वेळी वसाहतींना पोळी देणे व पोळी कमी करणे तसेच मधाची वेळेवर काढणी.

४) वसाहतींचे विभाजन करून वसाहतींची संख्या वाढवणे.

मधमाशी पालन सुरु करताना सुरुवातीस योग्य व्यक्तीकडून सशक्त रोगविरहित वसाहती घ्याव्यात तसेच या वसाहतीमध्ये पुरेसा मकरंद व पराग यांचा साठा आहे का हेही बघावे. वसाहतींमध्ये योग्य अंतर तसेच वसाहतीच्या प्रवेशद्वाराची योग्य दिशा या गोष्टीकडे मधुबन लावताना लक्ष द्यावे.



## वसाहतीची तपासणी

वसाहतीची तपासणी स्वच्छ सूर्यप्रकाश, आल्हाददायक हवामान, वसाहतींना पुरेसे खाद्य मिळत असेल अशा वेळेस करावी. ढगाळ वातावरणात तसेच जोरात वारे वाहत असल्यास वसाहतींची तपासणी टाळावी. हंगाम संपल्यानंतर तसेच हंगामापूर्वी खाद्याचा दुष्काळ असताना वेळोवेळी वसाहतींमधील खाद्य तपासून वसाहतींना खाद्याचा पुरवठा करावा. वेळोवेळी रोग व शत्रू यांची पाहणी करून उपाययोजना करावी. तपासणीच्या पद्धती हंगामनिहाय परिस्थितीनुसार थोड्याफार प्रमाणात बदलत असतात, त्यामुळे याही गोष्टीचा पूर्णपणे अभ्यास नवीन मधमाशीपालकाने केला पाहिजे.

सर्वसाधारणपणे सुरुवातीच्या काळात वसाहत तपासत असताना स्वच्छ सूर्यप्रकाश, योग्य हवामान व पुरेसे खाद्य मिळत असताना तपासणी करावी. तसेच तपासणी करताना सैल कपडे वापरू नयेत. अत्तर किंवा वास येणारे तेल वापरू नये. वसाहतींच्या चौकटी ठेवत असताना यामध्ये राणी तसेच इतर माशा चिरडल्या जाणार नाहीत याचीही दक्षता घ्यावी. वेळोवेळी वसाहतींची स्वच्छता ठेवावी. अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टी लक्षात ठेवून वसाहतींची तपासणी करावी. वसाहतींची तपासणी करत असताना आपल्या मधुबनासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवावी तसेच प्रत्येक वसाहतीची यामध्ये नोंद करावी.

## फुलोरा उपलब्धीचा अभ्यास

मधमाशीपालन करत असताना सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे मधमाश्यांचे खाद्य आणि त्यासाठी आपणाला आपल्या परिसरातील फुलोऱ्याचा अभ्यास करून फुलोऱ्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. यासाठी आपल्या आजूबाजूच्या परिसरात मधुबनापासून दोन-तीन किलोमीटरपर्यंतच्या परिसरात मकरंद व पराग देणाऱ्या कोणत्या वनस्पती/ पिके उपलब्ध आहेत, कोणता फुलोरा कधी येतो व तो किती काळ टिकतो तसेच तो फुलोरा किती वसाहतींना पुरेसा ठरू शकतो याचा परिपूर्ण अभ्यास करून महिन्यानुसार व्यवस्थापन केले पाहिजे.

महाराष्ट्रात व महाराष्ट्राच्या आसपास मधमाशीपालनासाठी भरपूर फुलोरा उपलब्ध आहे. मधमाशीपालनातून आपण मधासोबतच मधमाशीपासून मिळणाऱ्या इतर पदार्थांचे उत्पन्न घेऊ शकतो. आपल्याकडे फळपिके, लिंबू, संत्री, मोसंबी, पेरू, कलिंगड, कवठ, बोर, पपई, नारळ, बियाणे पिके, तेलबिया पिके, जंगली वनस्पती कार्वी, जांभूळ, चिंच, बोर तसेच तृणधान्यांसह बाजरी, मका, तूर इत्यादींची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. यांचा फुलोरा मधमाशीपालनासाठी उपयुक्त असतो.

मधमाशी पालनातून शेती, शेतकरी व निसर्ग तर समृद्ध होईलच पण आपण मधमाशी संवर्धन करून मधमाशी पालनातून स्वतः आपली आर्थिक समृद्धी साधू शकतो. तसेच व्यवसाय करत असताना निसर्गाची व समाजाची सेवा आपल्या हातून घडते याचेही समाधान आपणास असते. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये जास्तीत जास्त युवकांनी, शेतकऱ्यांनी मधमाशीपालनाकडे वळावे असे वाटते. ■